लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती!



# देवनार प्रश्न न सुटल्याने मुंबईकर असल्याची लाज वाटते!

## २०३५ सालातील भारताचा वेध घेणारा अहवाल मांडताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांची खंत

प्रतिनिधी, मुंबई | April 21, 2016 2:42 AM

Like 8 Google +



ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर

२०३५ सालातील भारताचा वेध घेणारा अहवाल मांडताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांची खंत

देवनार कचराभूमी प्रकरण हे संपुष्टात आणता येण्यासारखे असूनही ते होत नाही, त्यामुळे मी मुंबईत राहत असल्याची लाज वाटते, अशा स्पष्ट शब्दांत अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी खंत व्यक्त केली. देवनार कचराभूमीची समस्या सोडविणे सोपे असून त्यासाठी कोणत्याही अंतराळ विज्ञानाची गरज नाही. अगदी काही लाख रुपयांचे बक्षीस जाहीर

करून एखादी स्पर्धा घेतली तरी ते शक्य आहे, असेही ते म्हणाले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व मराठी विज्ञान परिषद आयोजित 'विज्ञानगंगा' व्याख्यानमालेत 'टेक्नोव्हिजन २०३५' या त्यांच्या अध्यक्षतेखाली निर्मिलेल्या अहवालावर बोलताना त्यांनी वरील विधान केले. ऊर्जा, निवारा, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, राष्ट्रीय सुरक्षा, पर्यावरण, प्रशासन अशा देशापुढील प्रश्नांचे २०३५ मधील स्वरूप कसे असेल व त्याचे निवारण करण्यासाठी आत्तापासूनच काय उपाय योजावे लागतील याचा या अहवालात ऊहापोह आहे. या अहवालावर बोलताना त्यांनी देवनारचा प्रश्न नमूद केला, पण तो सरकारने कसा सोडवावा, याबाबत त्यांनी काही सांगितले नाही.

'टेक्नोव्हिजन २०३५' हा अहवाल डॉ. काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तज्ज्ञांच्या समितीने तयार केला आहे. हा अहवाल एका व्यक्तीचा नव्हे तर विविध क्षेत्रांतील पाच हजार लोकांशी केलेल्या चर्चेनंतर तयार झाला आहे. हा अहवाल भारतासाठी नव्हे तर भारतीयांसाठी आहे, असे डॉ. काकोडकर म्हणाले.

परदेशातच कोणतेही संशोधन होईल ही संकुचित वृत्ती बदलावी लागणार आहे. तंत्रज्ञानात सक्षम नसल्यास आपण आर्थिकदृष्टय़ा मागे पडू. तंत्रज्ञान हे राष्ट्र आणि व्यक्ती यांना सक्षम करते, मात्र आपल्याकडे असे तंत्रज्ञान नाही जे गावातील सामान्य माणसाला साभूत ठरेल, असे त्यांनी परखडपणे नमूद केले. या वेळी नागरिकांच्या वृत्तीवर त्यांनी टीका केली. आपल्या नागरिकांना सरकारवर ताशेरे ओढायची सवय आहे. आपण इतरांकडून अपेक्षा करतो, मात्र मेहनत घेण्यास तयार नसतो, असे त्यांनी सांगितले.  या वेळी प्रतिष्ठानचे शरद काळे, मराठी विज्ञान परिषदेचे अ. पां. देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

ताज्या बातम्यांसाठी लोकसत्ताचे मोबाईल ॲप डाऊनलोड करा.

First Published on April 21, 2016 2:42 am

**Web Title:** Anil Kakodkar Feel Shame On Deonar Issue